# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
## महाराष्ट्र अभियांत्रिकी (स्थापत्य) सेवा (मुख्य) परीक्षा- २०१५
### (जाहिरात क्रमांक १२८/२०१५ व अधिसूचना क्रमांक १४३ /२०१५)
### निकाल

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे दिनांक ९ व १० जानेवारी, २०१६ रोजी घेण्यात आलेल्या **महाराष्ट्र अभियांत्रिकी (स्थापत्य) सेवा (मुख्य) परीक्षा-** २०१५चा अंतिम निकाल श्रीमती किरण तिडके (T.A. NO-३/२०१६) (W.P. १२०३२/२०१५), श्रीमती प्रियंका सानप (O.A.२३२/२०१६) व श्रीमती रुचा तांदळे (T.A. NO-२/२०१६) यांनी महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधीकरण, औरंगाबाद येथे दाखल केलेल्या न्यायिक प्रकरणावरील अंतरिम आदेश विचारात घेवून सार्वजनिक बांधकाम विभागातील सहायक अभियंता, गट-अ श्रेणी -१ मधील अमागास (महिला) या वर्गवारीतील ३पदे, सहायक अभियंता, गट-ब, श्रेणी-२ मधील अमागास (महिला) वर्गवारीतील ३ पदे व सहायक अभियंता, गट- ब, श्रेणी -२ मधील खेळाडू वर्गवारीतील १पद अशी ७ पदे रिक्त ठेवून सदर प्रकरणी होणा-या अंतिम न्यायनिर्णयाच्या अधीन राहून प्रस्तुत पदाचा अंतिम निकाल दिनांक १४ सप्टेंबर, २०१६ रोजी जाहीर करण्यात आला होता.

२) सदर अंतिम निकालामध्ये रिक्त ठेवण्यात आलेल्या सार्वजनिक बांधकाम विभागातील सहायक अभियंता, गट-अ श्रेणी -१ मधील अमागास (महिला) या वर्गवारीतील ३पदे, सहायक अभियंता, गट-ब, श्रेणी-२ मधील अमागास (महिला) वर्गवारीतील ३ पदे अशा ६ पदांचा निकाल मा. न्यायाधिकरणाच्या दिनांक २३ फेब्रुवारी, २०१८ रोजीच्या आदेशानुसार आता जाहीर करण्यात आला असून त्यानुसार सुधारित शिफारसयादी व सुधारित गुणवत्तायादी प्रसिध्द करण्यात येत आहे.

३. T.A. No-०२/२०१६(WP No-१२०९/१५ वरील मा. न्यायाधिकरणाच्या आदेशानुसार सहायक अभियंता, गट- ब, श्रेणी -२ मधील गुणवत्ता धारक खेळाडू वर्गवारीतील १पद रिक्त ठेवण्यात आले आहे. तसेच सदर प्रकरणातील शिफारशी हया प्रस्तुत न्यायिक प्रकरणातील अंतिम न्यायनिर्णयाच्या अधीन राहून करण्यात येत आहेत.

४. तपशीलवार सुधारित शिफारस यादया आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आल्या आहेत.

५. प्रस्तुत अंतिम निकालात अर्हताप्राप्त/ शिफारसपात्र न ठरलेल्या ज्या उमेदवारांना त्यांच्या उत्तरपत्रिकेतील गुणांची पडताळणी करावयाची आहे, अशा उमेदवारांनी गुणपत्रके प्रोफाईलवर पाठविल्याच्या दिनांकापासून १० दिवसात आयोगाकडे Online पध्दतीने विहित नमुन्यात अर्ज करणे आवश्यक आहे. (कृपया आयोगाच्या वेबसाईटवरील “उमेदवारांना सर्वसाधारण सूचना” मधील सूचना क्रमांक ३.८पहावी. )

**दिनांक : १२ एप्रिल, २०१८**
**ठिकाण : मुंबई**

**विजया पडते**
**उपसचिव,**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई**